मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरीतील 100 होर्डिंगधारकांना नोटिसा

## शहरातील होर्डिंगधारकांना दरवर्षी परवाना नूतनीकरण करणे बंधनकारक

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील होर्डिंगधारकांना दरवर्षी परवाना नूतनीकरण करणे बंधनकारक असताना नूतनीकरणास टाळाटाळ केली जात असल्याचे समोर आले आहे. परवाना नूतनीकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या १०० होर्डिंगधारकांना नोटिसा देण्यात आल्या आहेत. ३१ मार्चपूर्वी नूतनीकरण न केल्यास संबंधित होर्डिंग अनधिकृत समजून कारवाई करण्याचा इशारा महापालिकेने दिला आहे.




महापालिकेची परवानगी न घेतला लावलेल्या होर्डिंगवर कारवाई करून होर्डिंगधारकांवर महापालिका प्रशासनाने गुन्हे दाखल केले आहेत. शहरातील किवळे येथे १७ एप्रिल २०२३ रोजी अनधिकृत होर्डिंग कोसळून पाच मजुरांचा मृत्यू झाला होता. या दुर्घटनेनंतर महापालिकेने शहरातील १७४ अनधिकृत होर्डिंग जमीनदोस्त केले. शहरात सद्य:स्थितीत सुमारे एक हजार ४०० होर्डिंग अधिकृत असल्याचा दावा आकाशचिन्ह व परवाना विभागाने केला आहे. किवळे दुर्घटनेनंतर प्रशासनाने होर्डिंगच्या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली असली तरी होर्डिंगधारकांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

शहरात अधिकृत असलेल्या एक हजार ४०० होर्डिंगधारकांपैकी शंभर होर्डिंगधारकांनी चालू आर्थिक वर्षासाठीच्या परवान्याचे नूतनीकरण केलेले नाही. त्यामुळे या होर्डिंगधारकांना आकाशचिन्ह व परवाना विभागाने नोटिस दिल्या आहेत. नोटीस मिळताच शंभरपैकी ४० होर्डिंगधारकांनी परवाना नूतनीकरणासाठी अर्ज केले आहेत. मात्र, अद्याप ६० जणांनी अर्ज केलेले नाहीत. होर्डिंगधारकांनी ३१ मार्चपूर्वी परवान्याचे नूतनीकरण करून घ्यावे, अन्यथा होर्डिंग अनधिकृत समजून कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

परवाना नूतनीकरण न केलेल्या शंभर होर्डिंगधारकांना नोटिसा दिल्या होत्या. त्यापैकी ४० होर्डिंगधारकांनी परवाना नूतनीकरणासाठी अर्ज केले आहेत. ३१ मार्चपूर्वी परवान्याचे नूतनीकरण न केल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा उपायुक्त प्रदीप ठेंगल यांनी दिला आहे.

### थकबाकी असणाऱ्या होर्डिंगधारकांनाही नोटिसा

» आकाशचिन्ह व परवाना विभागाला चालू आर्थिक वर्षात १८ कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. आतापर्यंत १६ कोटी ६७ लाख रुपयांचे उत्पन्न महापालिकेच्या तिजोरीत जमा झाले आहे. १५ होर्डिंगधारकांकडे दीड लाख ते पाच लाख रुपयांची थकबाकी आहे. त्यांनाही नोटिसा देण्यात आल्या आहेत.

# आंद्रा धरणावर जलउपसा केंद्रासाठी जागेची प्रतीक्षा!

## आमदार महेश लांडगे यांचा पाठपुरावा : जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

आंद्रा धरणातून पिंपरी-चिंचवड महापालिकेस अशुद्ध जलउपसा केंद्र, ॲप्रोच चॅनेल पंप हाउस, ॲप्रोच ब्रीज व सबस्टेशन इ. बांधणेकामी पुणे पाटबंधारे विभागाची जागा मिळावी, त्यासाठी जलसंपदा विभागाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

याबाबत राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या व त्या अनुशंगाने शहरासाठी वाढलेली पाण्याची मागणी याचा विचार करता भविष्यातील 2031 पर्यंतची शहराची लोकसंख्या गृहित धरुन जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासनाने आंद्रा धरणातून 36.870 द.ल.घ.मी पाणी कोटा आरक्षित केला आहे. त्यास अनुसरुन पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने पुणे पाटबंधारे विभागाच्या मालकीच्या जागेत मौजे गट नं. 38, मौजे शिरे, ता. मावळ, जि. पुणे या जागेत अशुद्ध जल उपसा केंद्र बांधण्यासाठी मान्यता दिली आहे.



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेस आंद्रा धरणातून अशुद्ध जल उपासा केंद्र, ॲप्रोच चॅनेल, पंप हाउस, ॲप्रोच ब्रीज व सबस्टेशन इ. बांधणेसाठी पुणे पाटबंधारे विभागाच्या मालकीच्या जागेत धरणाच्या वरच्या बाजुला गट. नं. 38, मौजे शिरे, ता. मावळ, जि. पुणे मधील आवश्यक ती जमीन कायमस्वरुपी देण्यात यावी, अशा मागणीचा प्रस्ताव पाठबंधारे विभागाकडे पाठवण्यात आला आहे.

पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणी पुरवठ्यासंदर्भात निकडीची बाब म्हणून जागा मागणीच्या प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत, अशी मागणीही आमदार लांडगे यांनी केली.

> पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी याचा विचार करुन तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली आंद्रा व भामा आसखेड धरणातून 267 एलएलडी पाणी आरक्षीत केले होते. त्यामधील भामा आसखेडमधून 100 एमएलडी पाणी शहरात दाखल झाले. भोसरी विधानसभा मतदार संघातील समाविष्ट गावांना सदर पाण्याचा पुरवठा सुरू आहे. आता उर्वरित आंद्रा धरणातील पाणी पुरवठा प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. धरणातून अशुद्ध जलउपसा करण्यासाठी केंद्र उभारण्याकरिता कायमस्वरुपी जागा मिळावी, असा पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाचा प्रस्ताव आहे. त्या अनुशंगाने जलसंपदा विभागाकडे पाठपुरावा करीत आहोत. त्याला यश मिळेल, असा विश्वास आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

# पुण्यातील 'जीबीएस'चा उद्रेक अखेर थांबला!

## पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाचे सार्वजनिक आरोग्य विभागाला पत्र

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात ९ जानेवारीपासून गुइलेन बॅरे सिंड्रोमचा (जीबीएस) उद्रेक होऊन रुग्णसंख्येत मोठी वाढ झाली होती. सिंहगड रस्ता परिसरात हा उद्रेक झाला होता. या भागात १८ फेब्रुवारीपासून एकही नवीन रुग्ण आढळून आलेला नाही. यामुळे पुण्यातील जीबीएसचा उद्रेक संपुष्टात आल्याचे पत्र महापालिकेचा आरोग्य विभाग सार्वजनिक आरोग्य विभागाला पाठविले आहे.



पुण्यात सिंहगड रस्त्यावरील नांदेड गाव परिसरात जीबीएसचे सर्वाधिक रुग्ण आढळून आले होते. या जीबीएस उद्रेकग्रस्त भागात १८ फेब्रुवारीपासून एकही नवीन रुग्ण आढळून आलेला नाही. सर्वसाधारणपणे एखाद्या आजाराचा शेवटचा रुग्ण आढळून आल्यानंतर त्याच्या अधिशयन काळाच्या दुप्पट कालावधीत एकही नवीन रुग्ण न आढळल्यास तो उद्रेक संपुष्टात आल्याचे जाहीर केले जाते. पुण्यात नोरोव्हायरस आणि कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी यांचा संसर्ग जीबीएस उद्रेकास कारणीभूत ठरला होता.

'महापालिकेच्या आरोग्य विभागाने नोरोव्हायरस आणि कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी या दोन्हींसाठी ८ ते १० दिवसांचा अधिशयन कालावधी निश्चित केला होता. उद्रेकग्रस्त भागात शेवटचा रुग्ण आढळून आता २७ दिवस झाले आहेत. अधिशयन कालावधीच्या दुप्पट काळात एकही रुग्ण आढळून आलेला नाही. यामुळे पुण्यातील जीबीएसचा उद्रेक संपुष्टात आल्याचे पत्र महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून सार्वजनिक आरोग्य विभागाचे सहसंचालक आणि उपसंचालक यांना पाठविण्यात आले आहे. त्यांनी मंजुरी दिल्यानंतर हा उद्रेक संपुष्टात आल्याचे अधिकृतरीत्या जाहीर करण्यात येईल,' अशी माहिती महापालिकेच्या आरोग्यप्रमुख डॉ. नीना बोराडे यांनी दिली.

राज्यात जीबीएसचे आतापर्यंत २३० रुग्ण आढळून आले असून, त्यातील २०२ रुग्णांचे जीबीएस निदान झाले आहे. पुण्यात जीबीएसचे आतापर्यंत सर्वाधिक रुग्ण आढळले असून, त्यात पुणे महापालिका ४६, महापालिकेत नव्याने समाविष्ट गावे ९५, पिंपरी-चिंचवड महापालिका ३४, पुणे ग्रामीण ४० अशी रुग्णसंख्या आहे. राज्यात इतर जिल्ह्यांत आतापर्यंत १५ रुग्ण आढळून आले आहेत. आतापर्यंत जीबीएसमुळे १२ जणांचा मृत्यू झाला आहे. जीबीएसच्या पहिल्या रुग्णाचा मृत्यू सोलापूरमध्ये झाला. हा रुग्ण पुण्यातून सोलापूरला गेला होता. त्यानंतर पुण्यात १० आणि पिंपरी-चिंचवडमध्ये एका रुग्णाचा मृत्यू झाला आहे.

### राज्यातील जीबीएस प्रादुर्भाव

- एकूण रुग्णसंख्या - २३०
- रुग्णालयात दाखल - ३३
- अतिदक्षता विभागात - २४
- व्हेंटिलेटरवर - १६
- बरे झालेले रुग्ण - १८५
- मृत्यू - १२

> पुण्यात जीबीएसचा उद्रेक होण्यास कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी आणि नोरोव्हायरसचा संसर्ग कारणीभूत ठरला होता. या दोन्हींच्या अधिशयन कालावधीच्या दुप्पट काळात एकही नवीन रुग्ण उद्रेकग्रस्त भागात आढळून आलेला नाही. त्यामुळे जीबीएस उद्रेक संपुष्टात आल्याचे पत्र सार्वजनिक आरोग्य विभागाला पाठविले आहे.
>
> **- डॉ. नीना बोराडे, आरोग्य प्रमुख, महापालिका.**

# पिंपरी चिंचवडमध्ये मराठी चित्रपट महोत्सव!

## प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आयोजन : महापालिका व मराठी चित्रपट असोसिएशनतर्फे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

'मराठी चित्रपट संवर्धन आणि प्रदर्शनास चालना' या बहूउद्देशीय संकल्पनेतून पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि मराठी चित्रपट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने नाट्यगृहात चित्रपट संकल्पने अंतर्गत मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले आहे. २४ मार्च ते २५ मार्च २०२५ याकाळात पिंपरी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे पोस्टर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या हस्ते आज बुधवारी (१९ मार्च) प्रकाशित करण्यात आले.

याप्रसंगी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उप आयुक्त पंकज पाटील,उप आयुक्त आण्णा बोदडे,विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, मुख्य लिपिक देवेंद्र मोरे, मराठी चित्रपट असोसिएशनचे प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पाटील, प्रदेश सरचिटणीस कौस्तुभ कुलकर्णी उपस्थित होते.

मराठी चित्रपट महोत्सवामध्ये 'मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी', 'इलू इलू', 'मुक्काम पोस्ट देवाचं घर', 'चिकी चिकी बुबूमबूम', 'श्यामची आई', 'संगीत मानापमान' असे विविध चित्रपट दाखवण्यात येणार आहे. या चित्रपटांची निवड विद्यार्थी, तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक अशा सर्वच स्तरातील प्रेक्षकांचा विचार करून करण्यात आली आहे. तरी जास्तीत



जास्त नागरिकांनी या चित्रपट महोत्सवामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

### तिकिटाची किंमत नाममात्र

**मराठी चित्रपट महोत्सवामध्ये दाखवण्यात येणारे चित्रपट हे नुकतेच प्रदर्शित झाले आहेत. महोत्सवामध्ये या चित्रपटासाठी नाममात्र ५० रुपये तिकीट ठेवण्यात आले आहे. हे तिकिट ऑनलाइन तसेच ऑफलाइन पद्धतीने खरेदी करता येणार आहे. ऑनलाइन तिकीट खरेदी ticketkhidakee.com या संकेतस्थळावर करता येईल. तसेच प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथेही २१ मार्च २०२५ पासून तिकीट विक्री सुरू करण्यात येणार आहे. याशिवाय प्रेक्षकांना ७८९७८९७२४७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करून तिकीट बुक करता येईल.**

> मराठी भाषेला समृद्ध करणाऱ्या उपक्रमांना नेहमीच पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रोत्साहन देत असते. महानगरपालिकेने आता मराठी चित्रपट असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने मराठी चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले आहे. या महोत्सवात दाखवण्यात येणारे चित्रपट प्रत्येक वयोगटातील प्रेक्षक विचारात घेऊन निवडण्यात आले असून या महोत्सवाला शहरातील नागरिकांनीही उत्तम प्रतिसाद द्यावा.
>
> **- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त**

> मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मराठी भाषेचा प्रचार प्रसारासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. मराठी चित्रपट महोत्सव या उपक्रमांचा एक भाग आहे. मराठी भाषेचे सांस्कृतिक वैभव जनसमान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी, मराठी भाषेबद्दल आपुलकी आणि प्रेम निर्माण करण्यासाठी हा महोत्सव उपयुक्त ठरेल.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक**

# आता थकबाकीदारांचे नळजोड खंडित

## 108 सदनिकाधारकांकडे 46 लाख 67 हजार 287 रुपयांची मालमत्ताकराची थकबाकी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी, बोऱ्हाडेवाडी येथील सिल्वर ओक्स गृहनिर्माण सोसायटीतील १०८ सदनिकाधारकांकडे ४६ लाख ६७ हजार २८७ रुपयांची मालमत्ताकराची थकबाकी आहे. नोटीस देऊनही कराची थकबाकी न भरल्याने अखेर महापालिकेने सोसायटीचे सहा नळजोड तोडून पाणी बंद केले आहे. यापुढील काळात ४० टक्क्यांपेक्षा जास्त सदनिकाधारकांकडे थकबाकी असल्यास सोसायटीचे नळजोड खंडित करण्याचा इशारा महापालिकेने दिला आहे.




पिंपरी महापालिकेच्या कर संकलन विभागाने वसुलीची मोहीम तीव्र केली आहे. मोशी करसंकलन कार्यालय हद्दीतील बोऱ्हाडेवाडीतील सिल्वर ओक्स सोसायटीतील 'अ' इमारतीमधील ४८ सदनिकाधारकांपैकी २० जणांकडे सात लाख ६५ हजार ३३१ रुपये, 'ब' इमारतीमधील १०७ पैकी ७० जणांकडे ३५ लाख ५१ हजार ५४७ आणि 'क' इमारतीच्या एकूण ५४ सदनिकाधारकांपैकी १८ जणांकडे तीन लाख ५० हजार ४१९ रुपये इतका मालमत्ता कर थकित आहे. तिन्ही इमारतीमधील १०८ सदनिकाधारकांकडे ४६ लाख ६७ हजार २८७ रुपयांची थकबाकी आहे. या तिन्ही इमारतीला महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून बारा नळजोडद्वारे पाणीपुरवठा केला जातो. त्यातील सहा नळजोड खंडित करून पाणीपुरवठा बंद केला आहे. दोन दिवसांत थकीत मालमत्ता कर न भरल्यास उर्वरित सहा नळजोड तोडण्याचा इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे.

सोसायटीतील सदनिकाधारकांनी मालमत्ता कराचा थकीत भरणा करावा. यापुढे ४० टक्क्यांपेक्षा जास्त सदनिकाधारकांकडे थकबाकी असल्यास सोसायटीचे नळजोड खंडित केले जाणार आहे. पाणीपुरवठा बंद करण्यात येणार असल्याचे कर संकलन व कर आकारणी विभागाचे सहायक आयुक्त अविनाश शिंदे यांनी सांगितले.

### 72 कोटींची पाणीपट्टी वसुली

» कर संकलनाचे उत्पन्न वाढत असताना पाणीपट्टीत घट होत होती. पाणी पुरवठा विभागाला अपुऱ्या मनुष्यबळामुळे वसुली करण्यात अडथळे येत होते. त्यामुळे मागील वर्षापासून महापालिकेच्या कर संकलन विभागाकडेच पाणीपट्टी वसुलीची जबाबदारी देण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षात पाणीपट्टीतून शंभर कोटी ७८ लाख रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. १७ मार्चअखेर ७१ कोटी ८६ लाख रुपयांची वसुली झाली आहे. १३ दिवसांत २८ कोटी ८२ लाख रुपयांची वसुली करण्याचे आव्हान आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पाणीपुरवठा विस्कळीत

## मागील 40 दिवसांमध्ये शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालय हद्दीत एक हजार 92 तक्रारी

**पिंपरी | प्रतिनिधी**

वाढत्या उन्हामुळे पाण्याची मागणीही वाढू लागली असून, विस्कळीत, अपुरा आणि कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. मागील ४० दिवसांमध्ये शहरातील आठही क्षेत्रीय कार्यालय हद्दीत एक हजार ९२ तक्रारी महापालिकेच्या सारथी हेल्पलाइनवर आल्या आहेत. यामधील ५४३ तक्रारींचा निपटारा करण्यात आला असून, ५४९ तक्रारी प्रलंबित आहेत.



पिंपरी-चिंचवड शहरात २५ नोव्हेंबर २०१९ पासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. त्यामुळे नागरिक त्रस्त आहेत. अनियमित, अपुऱ्या आणि कमी दाबाने पाणी येत असल्याची नागरिकांची सातत्याने ओरड सुरू आहे. उन्हाळा सुरू होताच शहरातील कूपनलिकांचे पाणी कमी झाले आहे. त्यामुळे नागरिकांना खासगी टँकरद्वारे तहान भागवावी लागत आहे. गृहनिर्माण सोसाट्यांना टँकरचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. शहराला सध्या पवना धरणातून ५२०, आंद्रातून ८०, तर एमआयडीसीकडून २० असा ६२० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणीपुरवठा केला जातो. त्यानंतरही औद्योगिकनगरीतील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांना पुरेसे पाणी मिळत नाही. दुसरीकडे शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असून, चारही बाजूंना टोलेजंग इमारती उभ्या होत आहेत. लोकसंख्या वाढत असताना पाण्याची मागणीही सातत्याने वाढू लागली आहे. भामा आसखेड धरणातून शहराला १६७ एमएलडी पाणी राखीव आहे. हे पाणी आणण्यासाठी जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे.

महापालिकेच्या प्रत्येक जनसंवाद सभेत पाण्याच्या तक्रारी वाढत आहे. १ फेब्रुवारी ते १२ मार्च या ४० दिवसांच्या कालावधीमध्ये महापालिकेच्या सारथी हेल्पलाइनवर अपुऱ्या व कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या एक हजार ९२ तक्रारी आल्या आहेत. 'ड' प्रभागातून सर्वाधिक २११, तर सर्वात कमी 'ह' प्रभागातून ४५ तक्रारी आल्या आहेत.

पाण्याच्या तक्रारींमध्ये वाढ झाली आहे. नागरिकांनी पिण्याचे पाणी गाडी, अंगण धुण्यासाठी वापरू नये. पिण्याच्या पाण्याचा गैरवापर केल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांनी दिला आहे.

### पवना धरणात 52 टक्के पाणीसाठा

» पवना धरणातून दररोज पिण्यासाठी, सिंचनासाठी व औद्योगिक वापरासाठी पवना नदीद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. सद्यःस्थितीत पवना धरणामध्ये ५२.४६ टक्के (४.४६ टीएमसी) पाणीसाठा शिल्लक आहे. पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन पवना उपसा जलसिंचन उपविभागाचे सहायक अभियंता सचिन गाडे यांनी केले आहे.

# उष्माघातापासून करा बचाव; महापालिकेचे आवाहन

## शहरातील तापमान वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर स्वतःचा आणि कुटुंबीयांचा बचाव करण्याचे महापालिकेचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या शहराच्या तापमानात वाढ होत आहे. या तापमानामुळे उष्माघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वेळीच उपचार न केल्यास उष्माघातामुळे आणि त्यामुळे होणाऱ्या डिहायड्रेशनमुळे (जलशुष्कता) मृत्यूही ओढवू शकतो. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या प्रमुख डॉ. निलिमा बोराडे यांनी केले आहे.

सध्या शहराच्या तापमानात वाढ होत आहे. या तापमानामुळे उष्माघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वेळीच उपचार न केल्यास उष्माघातामुळे आणि त्यामुळे होणाऱ्या डिहायड्रेशनमुळे (जलशुष्कता) मृत्यूही ओढवू शकतो. त्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या प्रमुख डॉ. निलिमा बोराडे यांनी केले आहे.

गेल्या काही दिवसांत शहरातील तापमानातही वाढ झाली आहे. हवामान खात्याने पुढील काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. यामुळे उष्माघाताचा धोका निर्माण झाला असून, नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे असल्याचे महापालिकेच्या आरोग्य विभागाने निवेदनाद्वारे स्पष्ट केले आहे. उन्हात शारीरिक श्रमाची अंग मेहनतीचे आणि कष्टाची कामे करणे, कारखान्याच्या बॉयलर रुममध्ये काम करणे, कारखान्यात काम करणे, जास्त तापमानाच्या खोलीमध्ये काम करणे, घट्ट कपड्यांचा वापर करणे, अशा प्रत्यक्ष उष्णतेशी अथवा तापमानातील वाढत्या परिस्थितीशी सतत संपर्क येण्याने उष्माघात होऊ शकतो.



### प्राथमिक उपचार

» रुग्णास प्रथम सावलीत आणावे. रुग्णाचे तापमान खाली आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी रुग्णाचे कपडे सैल करून त्वरित अंग थंड करून पाण्याने शरीराचे तापमान कमी होईपर्यंत पुसत राहावे. रुग्णास हवेशीर आणि थंड खोलीत ठेवावे. खोलीतील पंखे, कुलर, एयर कंडिशनर त्वरित चालू करावे. रुग्ण शुद्धीवर आल्यास त्यास थंड पाणी, जलसंजीवनी द्यावे आणि डिहायड्रेशन टाळावे. चहा, कॉफी देऊ नये. रुग्णाच्या काखेखाली आइसपॅक ठेवावे. रुग्णाच्या कपाळावर थंड पाण्याचा पट्ट्या ठेवाव्या. थर्मामीटरने रुग्णाचे तापमान बघत रहावे. ३६.८ सेल्सिअस तापमान होईपर्यंत वरील उपचार चालू ठेवावे. रुग्णाने नजीकच्या मनपा आरोग्य केंद्रात अथवा खाजगी रुग्णालयाशी संपर्क साधावा. रुग्णालयात भरतीची गरज पडल्यास ॲम्बुलन्ससाठी १०८ वर कॉल करावा.

### काय आहेत प्रतिबंधक उपाय?

» वाढत्या तापमानात फार वेळ कष्टाची कामे करणे टाळणे व शक्य नसल्यास थोड्या वेळाने सावलीत विश्रांती घेऊन पुन्हा काम करावे, कष्टाची कामे सकाळी लवकर अथवा संध्याकाळी कमी तापमानात असताना करावी.

» उष्णता शोषून घेणारे कपडे (काळ्या किंवा भडक रंगाचे) वापरू नये. सैल पांढरे किंवा फिकट रंगाचे सुती कपडे वापरावे. तीव्र उन्हाच्या वेळेस बाहेर जाणे टाळावे. बाहेर प्रवासाला जाताना पाणी सोबत ठेवावे.

» पाणी भरपूर प्यावे. डिहायड्रेशन होऊ देऊ नये. गरज पडल्यास लिंबू सरबत, लस्सी, ताक, नारळ पाणी इत्यादी प्यावे. उन्हात बाहेर जाताना गॉगल्स, डोक्यावर टोपी, टॉवेल, फेटा, छत्री इत्यादींचा वापर करावा.

» घरामध्ये कामाच्या ठिकाणी पंखे, कुलर्स, एअर कंडिशनर्स, वाळ्याचे पडदे यांचा वापर करावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवण्यात याव्या. पार्क केलेल्या वाहनांमध्ये मुले किंवा पाळीव प्राण्यांना सोडू नका.

» पुरेसे पाणी प्या. तहान लागली नसली तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पाणी प्यावे. दुपारी बारा ते तीनदरम्यान घराबाहेर जाणे टाळा.

### ही आहेत उष्माघाताची लक्षणे

मळमळ, उलटी, हातापायात गोळे येणे, थकवा येणे, ४० डिग्री सेल्सिअसपेक्षा जास्त ताप येणे, त्वचा गरम होणे आणि कोरडी पडणे, क्वचित लाल होणे, घाम न येणे, डिहायड्रेशन, चक्कर येणे, निरूत्साही वाटणे, डोके दुखणे, छातीत धडधड होणे, रक्तदाब वाढणे, मानसिक अस्वस्थता, बेशुद्धवस्था इत्यादी.

# 13 दिवसांत 204 कोटी वसुलीचे 'टार्गेट', महावितरणकडून प्रत्येक अभियंता, लाइनमनांना जबाबदारी

## ग्राहकांनी थकबाकीसह चालू वीजबिल तातडीने भरुन महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन महावितरण बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी केले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष संपण्यास अवघे १३ दिवस उरले असून १३ दिवसांत २०४ कोटी रुपये वसुलीचे टार्गेट महावितरणने ठेवले आहे. प्रत्येक अभियंता, लाइनमन यांना हे उद्दिष्ट (टार्गेट) विभागून दिले आहे. वसुलीसाठी वीजपुरवठा खंडित करण्याचे आदेश सर्व कर्मचाऱ्यांना दिले आहेत. गैरसोय टाळण्यासाठी ग्राहकांनी थकबाकीसह चालू वीजबिल तातडीने भरुन महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन महावितरण बारामती परिमंडलाचे मुख्य अभियंता धर्मराज पेठकर यांनी केले आहे.

ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी महावितरण कायम प्रयत्नशील असते. अखंडित वीज पुरविणे जशी महावितरणची जबाबदारी आहे. वापरलेल्या विजेचे बिल वेळत भरणे ही ग्राहकांची जबाबदारी आहे. परंतु, काही ग्राहक त्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे महावितरणला वीजबिल वसुलीसाठी वीजपुरवठा खंडित करण्याची कटू कारवाई करावी लागते.

बारामती परिमंडलात लघुदाब वर्गवारीतील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक व इतर ग्राहकांकडे ११२ कोटींची थकबाकी आहे. चालू महिन्याची मागणी २५७.५३ कोटी असे मिळून मार्च महिन्यात बारामती परिमंडलास ३६९.४६ कोटी वसुलीचे उद्दिष्ट सांघिक कार्यालयाकडून दिले आहे. १८ दिवसांत केवळ १६६ कोटी रुपये वसूल झाले आहे. हे प्रमाण एकूण उद्दिष्टाच्या ४४.९३ टक्के इतकेच आहे. त्यामुळे उरलेल्या १३ दिवसांत वसुलीचा वेग वाढवावा लागणार असून, कोणत्याही परिस्थितीत २०४ कोटी रुपये वसुलीचे लक्ष गाठणार असल्याचे पेठकर यांनी सांगितले. त्यासाठी दैनंदिन वसुलीवर लक्ष ठेवण्यासाठी विभागनिहाय पथके तयार केली आहेत.




### रोहित्राची थकबाकी शून्य करावी- पेठकर

» मुख्य अभियंता धर्मराज पेठकर म्हणाले की, रोहित्रांची जबाबदारी वीज कर्मचाऱ्यांना नेमून दिलेली असते. परिमंडलातील सर्व वीज कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अखत्यारित रोहित्रावरील सर्व ग्राहकांचे वीजबिल वसूल करुन थकबाकी शून्य करावी, असे निर्देश सर्वांना दिले आहेत.

### ऑनलाइन वीजबिल भरल्यास सूट

» ग्राहकांना वीजबिल भरता यावे याकरिता सुट्टींच्या दिवशी अधिकृत वीजबिल भरणा केंद्रे सुरु ठेवली आहेत. रांगा टाळून महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर व महावितरण मोबाईल ॲपद्वारेही सहज व घरबसल्या कोठूनही वीजबिल भरता येते. ऑनलाइन वीजबिल भरल्यास वीजबिलामध्ये ०.२५ टक्के आणि पहिल्या सात दिवसांत (Prompt Payment) बिल भरल्यास १ टक्का असे एकूण १.२५ टक्के सूट मिळते. क्रेडिट कार्ड वगळता इतर पर्यायाद्वारे ऑनलाइनद्वारे होणारा वीजबिल भरणा नि:शुल्क आहे.